कार्यकारी प्राधिकरणे विभाग

**मुंबई विद्यापीठ**

क्र.काप्रावि/कार्यवाही/८५/२०१२

**परिपत्रक :**

व्यवस्थापन परिषदेने दिनांक **२१ ऑगस्ट, २०१२** च्या सभेत विद्यापीठ अधिकारी आणि संबंधित विभाग प्रमुख यांच्याकडून आलेल्या प्रत्येक बाबीवर घेतलेले निर्णय मूळ कागदपत्रासह संबंधित विभागाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यांना अशी विनंती करण्यात येते की, विभागाने त्या निर्णयावर कार्यवाही करून त्यासंदर्भात संबंधिताना पाठविलेली पत्रे/परिपत्रके/आदेश यांच्या प्रती (असल्यास) या विभागाने पाठविलेल्या परिपत्रकाचा क्रमांक व तारीख तसेच व्यवस्थापन परिषदेच्या सभेची तारीख आणि बाब क्रमांक यांचा उल्लेख यासह कार्यवाही अहवाल **दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजी किंवा तत्पूर्वी सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग यांच्याकडे पाठवावा.**

| विभाग | बाब क्रमांक | घेणा-याची सही |
|---|---|---|
| वित्त व लेखा अधिकारी....<br>वित्त व लेखा विभाग<br>(Accounts Section) | १२ | 31/8 |
| उप-कुलसचिव........<br>आस्थापना विभाग<br>(Establishment Section) | ४, ७, १३, १५, १६ | 31/8/12 |
| उप-कुलसचिव..........<br>संलग्नता/मान्यता विभाग<br>(Affiliation Section) | ५ | 31/8/12 |
| उप-कुलसचिव..........<br>घटक महाविद्यालये कक्ष<br>(Concol Section) | १४ | 31/8/12 |
| उप-कुलसचिव........<br>नावनोंदणी विभाग (Enrollment) | ८, ९ | |
| उप-कुलसचिव........<br>मान्यता व पात्रता विभाग<br>(Eligibility & Migration) | ६ | |
| अधिक्षक.....<br>प्रबंध विभाग<br>(Thesis section) | १० | 31/08/12 |
| उप-कुलसचिव........<br>परीक्षा भवन,<br>प्रश्नपत्रिका कक्ष<br>(Examination Section) | ११ | |

मुंबई - ४०० ०३२.

३० ऑगस्ट, २०१२.

कुलसचिवांकरिता.

DN
31/8

Scanned by CamScanner

मसुदा
क्र.४/२०१२-२०१३

गोपनीय
व्यवस्थापन परिषद
२१ ऑगस्ट, २०१२

# मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२, येथे *मंगळवार दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ रोजी सकाळी ११.३०* वाजता सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. डॉ. गुरूनाथ वा. पंडीत
४. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
५. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे
६. प्राचार्य दत्ताजीराव यशवंतराव पाटील
७. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर
८. डॉ. वसंत सिताराम शेकडे
९. डॉ. (श्रीमती) मधु सुधीर परांजपे
१०. प्राचार्य (डॉ) अशोक पां. महाजन
११. डॉ. विजय भालचंद्र जोशी
१२. डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
१३. श्री. संजय बा. शेटे

श्री. भा.ल.राठोड., वित्त व लेखा अधिकारी हे कायम निमंत्रित म्हणून सभेस उपस्थित होते.

सर्वप्रथम कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले.

सभेला सुरूवात करताना कुलगुरूंनी सांगितले की, डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले, श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे आणि डॉ. सुरेश किसनराव उकरंडे यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याने त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी. अशी त्यांनी विंनती केली आहे.

व्यवस्थापन परिषदेने डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले, श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे आणि डॉ. सुरेश किसनराव उकरंडे यांची या सभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

यानंतर, श्री. प्रभाकर कुंटे, श्री. विलासराव देशमुख, श्री. दारासिंग रंधावा, श्रीमती. मृणालताई गोरे, श्री. राजेश खन्ना, श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव श्री. कुमार खैरे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वती भगवान खैरे, डॉ. गुरूनाथ पंडीत यांचे वडील श्री. वासूदेव श्रीनिवास पंडीत व डॉ. विजय जोशी यांचे वडील श्री. भालचंद्र अनंत जोशी यांच्या दु:खद निधनाबद्दल परिषदेस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली व श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली -**

## श्री. प्रभाकर कुंटे

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, कॉंग्रेस नेते व माजी मंत्री श्री. प्रभाकर कुंटे यांचे दि. १५ ऑगस्ट, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९2 वर्षांचे होते. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली होती. सन १९७२ मधून धारावी मतदारसंघातून ते विधानसभेवर निवडून आले होते. तसेच म्हाडाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते.

Scanned by CamScanner

## श्री. विलासराव देशमुख

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार दशकांहून अधिक काळ महत्वाची भूमिका बजावणारे कॉंग्रेस नेते, केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञानमंत्री आणि माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांचे दि. १४ ऑगस्ट, २०१२ रोजी आजारामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

## श्री. दारासिंग रंधावा

कुस्तीच्या आखाडयात भारताचा झेंडा फडकवणारे जगप्रसिध्द फ्रीस्टाइल कुस्तीवीर, रूस्तम ए हिंद आणि अभिनेते श्री. दारासिंग रंधावा यांचे दि. १२ जुलै, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

## श्रीमती. मृणालताई गोरे

सामाजिक चळवळीत 'पाणीवाली बाई' म्हणून प्रसिध्द असलेल्या ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि ज्येष्ठ समाजवादी नेत्या श्रीमती मृणालताई गोरे यांचे दि. १७ जुलै, २०१२ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

## श्री. राजेश खन्ना

लोकसभेचे माजी खासदार व बॉलिवूडचे सुपरस्टार श्री. राजेश खन्ना यांचे दि. १८ जुलै, २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते. श्री. राजेश खन्ना यांनी आपल्या कारकिर्दीत जवळपास १६३ सिनेमामध्ये कामे केली.

श्री. राजेश खन्ना यांच्या अभूतपूर्व लोकप्रियतेमुळे मुंबई विद्यापीठाने 'द करिश्मा ऑफ राजेश खन्ना' या नावाचा धडा शालेय पुस्तकात समाविष्ठ केला होता. श्री. राजेश खन्ना यांना १९९५ साली कलारत्न पुरस्कार व २००५ साली फिल्मफेअरचा जीवनगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

## श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले

ज्येष्ठ संगीतकार श्री. बाळासाहेब श्रीपती तथा बाळ पळसुले यांचे दि. ३० जुलै, २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. श्री. बाळ पळसुळे यांनी १५० हून अधिक चित्रपटांसाठी संगीत दिले. दादासाहेब फाळके अकादमीने २०१० साली त्यांना चित्रकर्मी सन्मान बहाल केला होता.

## श्री. दिग्विजय खानविलकर

राज्याचे माजी आरोग्यमंत्री व करवीर विधानसभा मतदारसंघाचे तब्बल 2५ वर्षे प्रतिनिधित्व केलेले श्री. दिग्विजय खानविलकर यांचे दि. ९ ऑगस्ट, 20१2 रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६० वर्षांचे होते.

## प्रा. राम बापट

ज्येष्ठ विचारवंत व पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक रामचंद्र तथा राम बापट यांचे दि. 2 जुलै, 20१2 रोजी अल्प आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

Scanned by CamScanner

### श्रीमती पार्वती भगवान खैरे

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव श्री. कुमार खैरे यांच्या मातोश्री श्रीमती पार्वती भगवान खैरे यांचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१२ रोजी निधन झाले.

### श्री. वासूदेव श्रीनिवास पंडित

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. गुरूनाथ पंडित यांचे वडील श्री. वासूदेव पंडित यांचे दिनांक १३ जून, २०१२ रोजी दु:खद निधन झाले.

### श्री. भालचंद्र अनंत जोशी

व्यवस्थापन परीषदेचे सदस्य डॉ. विजय भालचंद्र जोशी यांचे वडील श्री. भालचंद्र अनंत जोशी यांचे दिनांक १५ जुलै, २०१२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

**अभिनंदन -**

➢ मुंबई विद्यापीठातील अॅकडमी ऑफ थिएटर आर्टस चे संचालक प्रा. वामन केंद्रे यांना बीड येथील अ. भा. मराठी नाट्य परिषद शाखेतर्फे या वर्षापासून सुरू करण्यात येत असलेल्या स्व. डॉ. सुहासिनी इर्लेकर नाट्य-पुरस्कारासाठी ज्येष्ठ रंगकर्मी म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

➢ मुंबई विद्यापीठातील सुरक्षा संदर्भातील उपाययोजनेअंतर्गत मुंबई विद्यापीठातील पाच सुरक्षा रक्षकांना दि. 23 ते 30 जुलै, 2012 या कालावधीत नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई येथे ''फायर फायटींग'' प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात आले होते. प्रशिक्षण पुर्ण करणारे सुरक्षा रक्षकांची नावे - श्री. सुरेश शांताराम पवार, श्री. रोहीदास नामदेव वंडेकर, श्री. मारूती विष्णु मोरे, श्री. समीर सुभाष राऊळ, श्री. सचीन भगवान रूके या पाचही सुरक्षा रक्षकांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले आहे.

<u>बाब १:</u> दिनांक २८ जून, २०१२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील सुधारणांसह सभागृहाने मान्य केले व नंतर कुलगुरूंनी इतिवृत्तावर स्वाक्षरी केली.

<u>दिनांक २८ जून, २०१२</u>
<u>पान क्र.४</u>
बाब क्र. १३ चा ठराव.

असा ठराव करण्यात आला की, बाब क्र. ७.३ पुर्नविचारार्थ विद्वत परिषदेपुढे ठेवण्यात याव्यात.

<u>बाब २:</u> सर्व सदस्यांनी कन्व्हेशन सेंटरचे प्रेझेंटेशन पाहून मा. कुलगुरू व विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले. विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय कन्व्हेशन सेंटर बांधण्याच्या निर्णयाबाबत बहूमतानी मान्यता देण्यात आली. डॉ.वसंत शेकडे आणि श्रीमती मधु परांजपे यांनी आंतरराष्ट्रीय कन्व्हेशन सेंटर बाबत अभ्यास करुन निर्णय कळवतो असे सांगितले.

संचालक, महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ (BCUD) यांनी हार्वड विद्यापीठाबाबत सभागृहास माहिती दिली व हार्वड विद्यापीठा प्रमाणे विविध नावेन उपक्रमासाठी विद्यापीठ स्तरावर निधी उभारण्यासाठी समिती असावी असे सुचविले, त्याचप्रमाणे निधी उभारण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आली.

Scanned by CamScanner

१. डॉ. विजय जोशी
२. डॉ. सिध्देश्वर गडदे
३. डॉ. गुरूनाथ पंडीत
४. श्री. संजय शेटे
५. डॉ. डी. वाय. पाटील

बाब ३: असा ठराव करण्यात आला की, दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या इतिवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

Item 4: *Resolved* that the following powers delegate by the Hon'ble Vice-Chancellor to Pro-Vice-Chancellor under the delegation of powers envisaged in the Maharashtra Universities Act, 1994 under clause No. be accepted.

1. Development of the University Departments including Centers for Advanced Studies, D.S.A., Departmental Research Support, Research Projects financed by other agencies like U.G.C., D.A.E., D.S.T, C.S.I R., D.O.E. etc.
2. Sir J. J. College of Architecture, Area Studies Programmes, J. B. Institute of Management Studies, Institute of Distance and Open Learning, Western Regional Instrumentation Centre, Garware Institute of Career Education and Development.
3. Cultural Exchange Programmes including foreign visitors, deputation / nomination of teachers for attending conferences, courses etc.
4. Library Committee.
5. Eligibility, Migration and Enrolment Section, Statistical Unit.
6. Under-graduate Studies Unit, Handbook of the University Part-I (Calendar), Part-II (Statues, Ordinances, Regulations, Rules, etc.), Part-III (Textbooks and Recommended books) and Part-IV (Scholarships and Fellowships), Internship of Students.
7. Examinations (Theory as well as Research), all matters pertaining to examinations like appointment of seasonal staff, computerization and other administrative and financial matters pertaining to examinations.
8. Students' Welfare – Department of Students' Welfare, Students' Council.
9. Sports Committee, Inter Collegiate and Inter-University Tournaments.
10. N.S.S., N.C.C., Department of Adult and Continuing Education and Extension Services, Board of Extra-Mural Studies.
11. Recognition of Institutions (Section 84 of M.U. Act), unattached Hospitals.
12. Buildings & Works Committee – Construction and Maintenance of Buildings – Campus Development Unit (University Engineers), Campus Development Unit II (Vidyanagari) (all administrative and Financial matters).
13. Hostels.
14. Publication..
15. University Press, Paper and Stationery.

Item 5: *Resolved* that the Perspective Plan for education at development for the colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for Higher education having due regard in particular to the needs of unsaved and under-developed areas within the jurisdiction of the University for next five years from the academic year 2013-14 to 2017-18 presented in the Management Council meeting be accepted with suggestion of the members.

Scanned by CamScanner

यानंतर पुढे असाही ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ३६(2) प्रमाणे सदर बृहतआराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद राज्य शासन व महामहिम कुलपती यांच्याकडे सादर करण्यात यावा.

बाब ६: असा ठराव करण्यात आला की, श्री. ब्रिजकिशोर बी. कुशवाह यांना M.E(Civil) Engg. अभ्यासक्रमासाठी पात्रता प्रमाणपत्र भारत सरकारच्या परिपत्रका नुसार मान्यता देण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठ अद्यादेश क्र. ५१३४ मध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.

बाब ७: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या आस्थापनेवरील गट 'क' व 'ड' संवर्गातील रिक्त पदांची भरतीची पूर्व प्रक्रिया सरकार मान्य संस्थेकडून करून घेण्यासाठी निविदा मागविण्यास मान्यता देण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, हंगामी नेमणूकीबाबत मार्गदर्शक तत्व तयार करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.

बाब ८: असा ठराव करण्यात आला की, जनसेवा शिक्षण मंडळ, शिवळे तालुका मुरबाड जिल्हा ठाणे संचालित बी. एड. महाविद्यालय शिवळे यांनी शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते शैक्षणिक वर्ष २०१०-११ वर्षापर्यत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी न करता अध्यादेश क्र. ०.११४-A चे उल्लंघन केल्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार नावनोंदणी विभागाने महाविद्यालयास शिक्षण शुल्क दंडापोटी दुप्पट आकारल्याने दंडाचा पुर्नविचार तसेच अभ्यास करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली.

१. डॉ. सिध्देश्वर गडदे २. डॉ. (श्रीमती) मधू परांजपे
३. प्राचार्य (डॉ) अशोक महाजन ४. प्राचार्य गोरक्ष पारगांवकर

बाब ९: असा ठराव करण्यात आला की, आर. जे. ठाकूर कला व वाणिज्य महाविद्यालय आणि बी.एन.एन. कला व वाणिज्य महाविद्यालयांवर विद्यापीठ परिपत्रकाच्या अनुषंगाने दंड आकारण्यात यावा व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून नावनोंदणी प्रक्रियेस मान्यता देण्यात यावी.

बाब १०: असा ठराव करण्यात आला की, साठे महाविद्यालयास पीएच. डी. अभ्यासक्रमाच्या हिंदी विषयासाठी नियमित मान्यता मिळण्यासाठी भरावयाची विलंब फी माफ करण्यासाठी स्थानिक चौकशी समितीने केलेली शिफारस अमान्य करण्यात आली.

तसेच पुढे असाही ठराव करण्यात आला की, साठे महाविद्यालयाने पीएच.डी अभ्यासक्रमास नव्याने मान्यता (Recognition) घेण्यासाठी अर्ज करावा.

बाब ११: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेच्या एम. एच. आर. एम. (M.H.R.M.) या विषयाची प्रश्नपत्रिका दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी यांचेकडून फुटल्या प्रकरणी दिनांक १ एप्रिल, २०१२ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा मंडळाच्या निर्णयानुसार बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी यांना रु. १,००,०००/- (रूपये एक लाख) आकारण्यात आलेल्या दंडाबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या भावना लक्षात घेता ही बाब परीक्षा मंडळाकडे पुन्हा विचारार्थ पाठविण्यात यावी.

Scanned by CamScanner

बाब १२: असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात यावे.

बाब १३: सखोल चर्चाअंती असा ठराव करण्यात आला की, शासकीय कर्मचा-यांना अतिकालीक भत्ता (Overtime allowances) मिळत नाही. परंतु विद्यापीठातील कर्मचा-यास पुर्वीपासून अतिकालीक भत्ता देण्यात येत असल्यामुळे, मुंबई शहरातील सध्याची महागाई लक्षात घेता विद्यापीठातील कर्मचा-यांना मिळणारा अतिकालीक भत्याच्या दरामध्ये प्रत्येक वर्गातील कर्मचा-यांना रू. ५ वाढ करण्यात यावी.

Item 14: *Resolved* that the to grant permission to place the item of sanctioning the duty leave to the Director / Head / Principal / Professor / Associate Professor / Assistant Professor and Librarian of the affiliated institutions / colleges and University Department for attending the meetings of the University Authorities / Bodies / Committees, Conferences / Seminars / Workshops / Symposia / Refresher / Orientation courses approved by the University from time to time be accepted.

बाब १५: असा ठराव करण्यात आला की, वर्ग 'क' व 'ड' संवर्गातील हंगामी तत्वावर विद्यापीठ फंडातील पदांवर तसेच आवश्यकतेनुसार निर्माण केलेल्या अतिरिक्त पदांवर नव्याने करावयाच्या नियुक्त्या या सेवायोजन कार्यालयाकडून जेष्ठतेनुसार पात्र उमेदवारांच्या यादया मागवून तसेच वर्तमान पत्रात जाहिराती देऊन करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

बाब १६: असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठामध्ये संगणकीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यापीठांचे कामकाज संगणकीकृत करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सध्या विद्यापीठात संगणकीकरण करण्याचे काम केंद्रिय संगणकीय सुविधा (CCF) या केंद्रमार्फत तसेच विद्यापीठ संगणकीय केंद्र (UCC) यांच्या मार्फत केले जाते. दोन्ही संगणकीय केंद्रात कामकाजाचा समन्वय साधण्यासाठी दोन्ही केंद्राचे एकत्रिकरण करून संचालक हया एकच पदाच्या नियंत्रणाखाली आणण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, उपरोक्त संचालक पदी प्रतिनियुक्तीवर प्राचार्य किंवा प्राध्यापक या वर्गातून भरण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

मुंबई- -४०० ०३२
२९ ऑगस्ट, २०१२.

कुमार खैरे
कुलसचिव

Scanned by CamScanner